# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत**

**(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४**

**दूरध्वनी.क्र:-०२०-२६१२३०६६/६७** **वेबसाइड:-mscepune.in** **ई-मेल:- mscegcctbc@gmail.com**

जा.क्र./मरापप/मूल्य./२०२६/३९७१
दिनांक- ११/०९/२०२६

## प्रसिध्दीपत्रक

**शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुलै -२०२६ निकाल.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुलै -२०२६ मध्ये इंग्रजी ३०,४० व ५० श.प्र.मि. विषयाची परीक्षा दिनांक ०४/०७/२०२६ ते दि.१०/०७/२०२६ या कालावधीत आणि मराठी , हिंदी ३०,४० व इंग्रजी ६० श.प्र.मि. या विषयाची परीक्षा दिनांक १५/०७/२०२६ ते दि.२०/०७/२०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. सदर परीक्षेचा निकाल दिनांक **११/०९/२०२६** रोजी ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला आहे.या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या सकेंतस्थळावर उपलब्ध आहे.विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे/ गुणपत्रके डिजीटल स्वाक्षरीने ऑनलाईन स्वरुपात संबंधीत संस्थांच्या लॉगीनला उपलब्ध करुन देण्यात येतील. सदरील प्रमाणपत्रांची छपाईसंस्थांनी कलरप्रिंटद्वारे 100 जीएसएम (GSM) कागदावर करुन विद्यार्थ्यांना वितरीत करावे. तसेच संबंधीत विद्यार्थ्यास सॉप्टकॉपी PDF स्वरुपात देण्यात यावी. जेणे करुन विद्यार्थ्यांना भविष्यात प्रमाणपत्राच्या आवश्यकतेनुसार सदरील प्रमाणपत्र कलरप्रिंटद्वारे100 जीएसएम (GSM) कागदावर छपाई करुन घेता येईल. संस्थांनी संबंधीत विद्यार्थ्यास प्रमाणपत्र/गुणपत्रके वितरीत केलेली पोहच दप्तरी जतन करुन ठेवावी.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून **१०** दिवसात परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रुपये १००/- प्रमाण व छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रूपये ४००/- प्रमाणे रक्कम ऑनलाईन पध्दतीने दिनांक **२१/०९ /२०२६** पर्यंत भरण्यात यावेत. गुणपडताळणी व छायाप्रती प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन पाच दिवसात पुर्न-मुल्यांकनासाठी प्रती विषय रु.६००/- प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरुन अर्ज करावेत. यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

**निकालाची संक्षिप्त माहिती (३० श.प्र.मि.)**

| परीक्षेचे नाव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | अनुत्तीर्ण विद्यार्थी | राखीव | एकूण रद्द झालेले विद्यार्थी | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी ३० श.प्र.मि. | ६२७७७ | ५६०८७ | ६६९० | ३३७२३ | १९५८८ | २७७५ | ०१ | ६०.१३ % |
| मराठी ३० श.प्र.मि. | ४४६६८ | ३७२९३ | ७३७५ | १५६०९ | १९१७० | २५१४ | ०० | ४१.८६ % |
| हिंदी ३० श.प्र.मि. | ७३८ | ६६० | ७८ | ४५४ | १९४ | १२ | ०० | ६८.७९ % |

## निकालाची संक्षिप्त माहिती (४० श.प्र.मि.)

| परीक्षेचे नाव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | अनुत्तीर्ण विद्यार्थी | राखीव | एकूण रद्द झालेले विद्यार्थी | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी ४० श.प्र.मि. | ४३२७९ | ३८८५५ | ४४२४ | १६३०५ | १९८६६ | २६६१ | ०३ | ४१.९६ % |
| मराठी४० श.प्र.मि. | ३७८५ | ३३९९ | ३८६ | ९६९ | २३४५ | ८५ | ०० | २८.५१ % |
| हिंदी४० श.प्र.मि. | १६७ | १५७ | १० | ४६ | १०४ | ०७ | ०० | २९.३० % |

## निकालाची संक्षिप्त माहिती (५०श.प्र.मि.)

| परीक्षेचे नाव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | अनुत्तीर्ण विद्यार्थी | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी ५०श.प्र.मि. | १७५६ | १५८० | १७६ | ११९९ | ३८१ | ०० | ७५.८९ % |

## निकालाचीसंक्षिप्त माहिती (६० श.प्र.मि.)

| परीक्षेचे नाव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | अनुत्तीर्ण विद्यार्थी | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी ६० श.प्र.मि | ३९८ | ३७३ | २५ | १३२ | २४१ | ०० | ३५.३९ % |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने जुलै २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या संगणक टंकलेखन परीक्षेमध्ये ५३ संवेदनशील परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले होते. या परीक्षा केंद्रांवरील CCTV फुटेज ची तपासणी केली असता, परीक्षा केंद्रावरील IT टीचर, तेथील काही संस्थाचालक यांच्या संगनमताने काही अतिशय गंभीर असे मुद्दे/ प्रकार निदर्शनास आलेल्या असून, त्यामध्ये खालील परीक्षा केंद्रांचा समावेश आहे :-

५४०१ - कर्मयोगी दादा जुनिअर कॉलेज, परभणी

५४०२ - मोहिनी कला महाविद्यालय, परभणी

५४०३ - ज्ञानगंगा उच्च माध्यमिक विद्यालय, परभणी

५४०६ - शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालय, परभणी

५४०७ - आयजीएम पॅरामेडिकल कॉलेज, गंगाखेड (परभणी)

७३०३ - राजीव गांधी आयटीआय, गोंदिया

७५०८ - जिल्हा परिषद जुनिअर कॉलेज, भद्रावती, चंद्रपूर

७२०३ - नवजीवन विद्यालय, भंडारा

७३०२ - C.S. इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, देवरी

७२०६ - समर्थ महाविद्यालय, लाखनी भंडारा

८३०५ - बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, जिल्हा नांदेड

वरील परीक्षा केंद्रांवर निदर्शनास आलेल्या त्रुटी/ अनियमितता पुढीलप्रमाणे आहेत-

१.एका परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांचे चेहरे व्यवस्थित दिसू नयेत यासाठी कॅमेऱ्यावर चिकट पदार्थ /Glue सदृश पदार्थ लावण्यात आला. सदर बाब परीक्षा परिषदेच्या लक्षात आल्यानंतर मराठी विषयाच्या परीक्षेमध्ये मात्र स्पष्टपणे सीसीटीव्ही मध्ये चित्र दिसू लागले. एका परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा अँगल बदलण्यात येऊन, परीक्षा केंद्रावरील संपूर्ण रांग दिसणार नाही अशा पद्धतीने कॅमेरा सेट करण्यात आला.

२.प्रत्येक संगणकासाठी विशिष्ट Mac ID असतो व त्याच नोंदविलेल्या संगणकावर परीक्षा होईल अशी व्यवस्था परीक्षा परिषदेमार्फत करण्यात आलेली होती. तथापि परभणी जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर मात्र परिषदेकडे नोंदविलेले संगणक दुसऱ्या ठिकाणी चालविण्यात येऊन प्रत्यक्ष परीक्षा केंद्रामध्ये मात्र इतर संगणक ठेवण्यात आले होते व या संगणकांवर प्रसंगी Microsoft Word ओपन करून त्यामध्ये विद्यार्थी टाईप करीत असल्याचे आढळून आले आहे. काही उमेदवार तर चक्क काळे स्क्रीन असलेल्या संगणकासमोर कीबोर्डवर टाईप करत होते. सदर बाब म्हणजे निव्वळ परीक्षा परिषदेची फसवणूक आहे. प्रत्येक लॅब मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले होते. तथापि प्रत्येक संगणकाच्या स्क्रीनवर नेमकी कोणती हालचाल सुरू आहे? एवढे सूक्ष्म चित्रीकरण सीसीटीव्ही मध्ये शक्य नसल्याचे संबंधित आयटी टीचर यांच्या लक्षात आल्यामुळे, त्यांनी मूळ उमेदवार मूळ संगणक लॅब मध्येच डमी संगणकासमोर बसवून सदर विद्यार्थ्यांना टायपिंग करण्याचे फक्त सॉग करावे / ॲक्टींग करावी अशा सूचना दिल्याचे स्पष्ट दिसून येते. सीसीटीव्ही फुटेज मध्ये कोणत्याही प्रकारचे टायपिंग प्रत्यक्षात परीक्षेच्या EXE मध्ये केलेले नसताना सुद्धा या उमेदवारांचा निकाल पाहिला असता , त्यांना A+ ग्रेड मिळाल्याचे निष्पन्न झालेले आहे.

३.CCTV फुटेजमध्ये IT शिक्षक विद्यार्थ्यांना MCQ ची उत्तरे सांगताना दिसून येत आहेत. तसेच उत्तरे शोधण्यासाठी आयटी टीचर व विद्यार्थ्यांकडून मोबाईलचा वापर झाल्याचे देखील सीसीटीव्ही फुटेज मध्ये निष्पन्न झालेले आहे.

४. एका परीक्षा केंद्रावर तर चक्क एका महिला उमेदवाराने परीक्षा सुरू झाल्यानंतर तिच्या जागेवर डमी विद्यार्थ्याने बसून संपूर्ण परीक्षेमधील प्रश्न सोडविल्याचे निष्पन्न झाले आहे. मात्र सदर उमेदवाराचा पेपर पूर्ण झाल्यानंतर पुन्हा सदर महिला उमेदवार मूळ ठिकाणी येऊन बसली व तिचा मोबाईल ॲप मध्ये फोटो देखील काढण्यात आला. या सर्व प्रसंगाचे चित्रीकरण परीक्षा परिषदेकडे उपलब्ध आहे.

५.मूळ उमेदवार उपस्थित असताना डमी उमेदवाराने लॉगिन केल्याचे आढळून आले.

६.अनेक उमेदवार मोबाईल फोनवर MCQ ची उत्तरे शोधताना आढळून आले.

७.काही परीक्षा केंद्रांवर गती उताऱ्याचा सेक्शन ऑनलाईन डॅशबोर्ड नुसार सकाळी 9:25 वाजता पूर्ण झाला. मात्र, स्थानिक आयटी टीचर यांनी संगनमत केल्यामुळे या कालावधीतील कोणत्याही विद्यार्थ्याचे CCTV फुटेज उपलब्ध नाही. उपलब्ध फुटेज थेट सकाळी 9:35 वाजताच्या क्लिपपासून सुरू होते. म्हणजेच जाणीवपूर्वक स्पीड पॅसेज चे CCTV फुटेज परीक्षा परिषदेला उपलब्ध होणार नाही अशी व्यवस्था परीक्षा केंद्र स्तरावर आयटी टीचर यांच्याकडून करण्यात आली.

८.उमेदवार उपस्थित होता; मात्र तो परीक्षा देत नव्हता आणि केवळ स्क्रीनकडे पाहताना दिसून आला. तसेच, उर्वरित परीक्षा त्याच्यावतीने पूर्ण करण्यासाठी आयटी टीचर दुसऱ्या उमेदवाराला सूचना करताना दिसून आले.

९.CCTV फुटेजमध्ये उमेदवार परीक्षा देत व टायपिंग करत असल्याप्रमाणे दिसून आले. तसेच, IT शिक्षक विद्यार्थ्यांना उत्तरे सांगताना व Word File उघडण्यास सांगताना स्पष्टपणे दिसून आले. CCTV फुटेजनुसार, परीक्षेदरम्यान IT शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तसेच उमेदवार टायपिंग केल्याप्रमाणे वर्तन करताना दिसून आले.
ऑनलाइन डॅशबोर्डनुसार परीक्षा वेळेवर सुरू झालेली असताना सीसीटीव्ही फुटेज नुसार मात्र परीक्षा उशिरा सुरू झाल्याचे परीक्षा केंद्रामध्ये दाखविण्यात आले.परीक्षा सुरू झाल्याचे नमूद असलेल्या वेळेस कोणताही उमेदवार प्रत्यक्ष टायपिंग करताना किंवा परीक्षा देताना दिसून येत नाही.

१०.IT शिक्षक मोबाईल फोनवर उत्तरे शोधताना आणि त्यानंतर विद्यार्थ्याला MCQ ची उत्तरे सांगताना दिसून आले.

११.एका परीक्षा केंद्रावर रात्री बारा वाजता CCTV कॅमेऱ्याचा अँगल बदलण्यात आला. काही विद्यार्थी कॅमेरच्या मध्ये दिसणार नाहीत अशी जाणीवपूर्वक व्यवस्था आयटी टीचर यांच्या संगणमताने करण्यात आली.

संगणक संस्थेकडे उपलब्ध असलेला लाईव्ह ऑनलाइन डॅशबोर्ड, स्थानिक स्तरावर मोबाईल अटेंडन्स ॲप मध्ये घेण्यात आलेल्या हजेरीची वेळ, सीसीटीव्ही फुटेज मध्ये परीक्षेच्या संपूर्ण कालावधीत संगणकाच्या स्क्रीनवर कोणताही बदल आढळून न येणे म्हणजेच पर्यायाने संबंधित विद्यार्थ्याने कीबोर्डवर टायपिंग करण्याचे सोंग करणे, इत्यादी माध्यमातून वरील गैरप्रकार वरील परीक्षा केंद्रांवर उघडकीस आलेले आहेत. तथापि याची सखोल चौकशी करून संबंधितांवर गैरप्रकार केल्याप्रकरणी, तसेच परीक्षा परिषदेची फसवणूक केल्याप्रकरणी आवश्यकतेनुसार पोलिसात गुन्हे दाखल करण्यात येतील.

वरील प्रमाणे आढळून आलेल्या सर्व गैरप्रकारांची सखोल चौकशी करण्यासाठी मोठा कालावधी लागू शकतो. सखोल चौकशी करताना संबंधित उमेदवार, केंद्र संचालक, आयटी टीचर यांना सुनावणीसाठी बोलावून योग्य निष्कर्ष काढण्यास मदत होईल. तथापि वेळेत निकालही जाहीर करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे वरील सर्व परीक्षा केंद्रांवरील हजर विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येऊन, उर्वरित विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्यात येत आहेत.

11/9/26

**डॉ नंदकुमार बेडसे(भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे-४**

## शासकीयसंगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुलै - २०२६

## गुणपडताळणी सूचना.

१) गुणपडताळणीसाठी प्रती विषय रूपये 100/- (शंभर) शुल्क आकारण्यात येईल.

२) परिपत्रकात नमूद केलेल्या कालावधीत (10 दिवसात) परिषदेकडे विहित नमुन्यात संबंधित टंकलेखन /लघुलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर अर्ज भरता येणार नाही. तसेच ऑफलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) गुणपडताळणीसाठी एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.

४) गुणपडताळणी अर्ज अपुर्ण भरलेला असल्यास सबमिट (Submit) होणार नाही.

५) पुनर्मूल्यांकनाची तरतूद असल्याने पुनर्मूल्यांकन रक्कम रुपये 600/- प्रती विषय ऑनलाईन पध्दतीने भरुन केले जाईल.

६) गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची गुणपडताळणी करून दिली जाणार नाही.

७) मागणी अर्ज सादरकरण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असलेतरीही उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी केली जाणार नाही. तसेच शुल्कही परत मिळणार नाही.

८) गुणपडताळणीचा निकालसंस्थेच्या पत्त्यावर पोस्टाव्दारे / ई-मेलने पाठविण्यात येईल. उमेदवाराने संबंधित टंकलेखन संस्थेकडून निकाल प्राप्त करून घ्यावा.

९) गुणपडताळणी अर्ज उमेदवाराने ऑनलाईन सबमिट केला असेल आणि पुन्हा उत्तरपत्रिका छायाप्रत मिळण्याबाबत अर्ज सादर करावयाचा असल्यास त्यास छायाप्रतीसाठी रूपये 400/- शुल्क स्वतंत्रपणे ऑनलाईन पध्दतीने भरावे लागेल.

१०) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. म्हणजे एखाद्या विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणीकेल्यास त्या विषयाची गुणपडताळणी ही केली जाणार आहे.

11/9/26

**डॉ नंदकुमार बेडसे(भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे-४**

# शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुलै - २०२६

## उत्तरपत्रिका छायाप्रत मागणी अर्जाबाबत सूचना.

१) विद्यार्थ्याला फक्त त्याच्या स्वत:च्याच उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी परीक्षा परिषदेकडे करता येईल. यासाठी परीक्षा परिषदेकडे विहित पध्दतीने संगणक टंकलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

२) परिपत्रकात नमूद केलेल्या कालावधीत (10 दिवसात ) परिषदेकडे विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर ऑनलाईन अर्ज भरता येणार नाही. तसेच ऑफलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

३) ऑनलाईन अर्जातील माहिती पूर्णपणे भरलेली असावी. अपूर्ण अर्ज सबमिट (Submit) होणार नाही.

४) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी प्रति विषय रूपये 400/- इतके शुल्क आकारण्यात येईल. एकदा भरलेले शुल्ककोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.

५) शुल्क ऑनलाईन पध्दतीने (नेट बँकींग, क्रेडीट/ डेबीट कार्ड इत्यादी वापरून) भरावे लागेल.

६) उत्तरपत्रिका छायाप्रत मिळविण्यासाठी रूपये 400/- इतके शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरून अर्ज केला असल्यास त्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

७) उत्तरपत्रिकेची छायाप्रतची मागणी पोस्टाव्दारे असल्यास पोस्टाचा पूर्ण पत्ता जवळच्या खुणेसह देणे आवश्यक आहे. मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत विद्यार्थ्यांना अर्जात नमूदकेल्याप्रमाणे पोस्टाने /ई-मेलव्दारे संस्थेमार्फत देण्यात येईल. अर्जामध्ये भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे.

८) समक्ष छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशपत्र/फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. यासाठी प्रवेशपत्र अथवा कोणतेही फोटोसह ओळखपत्र मान्य करण्यात येईल.

९) उत्तरपत्रिका छायाप्रतहस्तपोच घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीतशी पोहोच देणे बंधनकारक राहील.

१०) गुणपडताळणीव छायाप्रती प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन पाच दिवसात पुनर्मूल्यांकनाची तरतूद असल्याने पुनर्मूल्यांकन रक्कम रुपये 600/- प्रती विषय ऑनलाईन पध्दतीने भरुन केले जाईल.

११) परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी झाली असल्याने त्याला अथवा अन्य कोणत्याही विद्यार्थ्यास माहिती अधिकाराखाली त्याच्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार नाही.

१२) परीक्षक / समीक्षक इत्यादीची माहिती, माहिती अधिकाराखाली देता येणार नाही.

१३) संबंधित विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकांची छायाप्रत अन्य कोणालाही देऊ नये. तसेच तिला प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्दी देण्यात येवू नये दिल्यास कारवाईस पात्र राहील.

१४) उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यात येणार असल्याने मूळ उत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

१५) मागणी अर्ज सादरकरण्याची मुदत संपल्यानंतरकोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असलेतरीही उत्तरपत्रिकेची छायाप्रत देता येणार नाही. तसेच शुल्कही परत मिळणार नाही.

१६) ऑनलाईन अर्जाची प्रत (प्रिंट आऊट) व शुल्क भरलेल्या चलनाची प्रत परिषदेकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यात येणारअसल्याने मूळउत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

11/9/26.

**डॉ नंदकुमार बेडसे(भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे-४**

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत

(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

दूरध्वनी.क्र:-०२०-२६१२३०६६/६७ वेबसाइड:-mscepune.in ई-मेल:- mscegcctbc@gmail.com


**परीक्षा प्राधान्य:** जा.क्र./मरापप/मूल्य./२०२६/३९७२

**तात्काळ:** दिनांक- ११/०९/२०२६

प्रति,
संस्थाचालक,
सर्व शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय:- शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) - जुलै २०२६ मधील उत्तरपत्रिका छायाप्रती मिळणेबाबत व गुणपडताळणी करणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, **शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) - जुलै २०२६** परीक्षेचा निकाल दिनांक ११/०९/२०२६ रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे. (GCCTBC) परीक्षेबाबत प्रसध्दि केलेल्या अधिसूचनेनुसार विद्यार्थ्यांना संबंधित संस्थेमार्फत गुणपडताळणी करणेकरिता व उत्तरपत्रिका छायाप्रती प्राप्त करून घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करता येईल.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसांत परीक्षार्थ्यांने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति रूपये १००/- प्रमाणे व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रूपये ४००/- प्रमाणे ऑनलाईन अर्जाव्दारे रक्कम रूपये दिनांक २१/०९/२०२६ पर्यंत जमा करण्यात यावे. गुणपडताळणी व छायाप्रती प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन पाच दिवसात पुर्न-मुल्यांकनासाठी प्रती विषय रु.६००/- प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरुन अर्ज करावेत. यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

11/9/26

**डॉ नंदकुमार बेडसे(भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे-४**

**प्रत:- माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव**

१) विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व.
२) शिक्षणाधिकारी (माध्य.) सर्व.

## (GCC-TBC) जुलै -२०२६

## गुणपडताळणी व उत्तरपत्रिका छायांकित प्रत मागणी अर्ज.

## (FLOW CHART)

**www.mscepune.in या वेबसाईटला भेट देऊन GCC-TBC बटनावर क्लिक करून संस्था Login करा.**

↓

**Mark Verification/Xerox Copy Option बटनावर क्लिक**

↓

**Checkout Result List**

↓

**A) Click Option Mark Verification if you want for appropriate Candidate.**
**B) Click Option Xerox copy if you want for appropriate Candidate**

↓

**Proceed to Payment वर Click करा.**

↓

**स्क्रिनवर येणाऱ्या माहितीची खात्री करून Pay Now बटनावर Click करावे.**

↓

**Online payment च्या उपलब्ध पर्यायांपैकी सोयीस्कर पर्याय निवडावा.**

↓

**आवश्यक माहिती अचकपणे भरून Make payment बटनावर Click करा.**

↓

**OTP/ATM PIN अचूकपणे नमूद करून Submit करा.**

↓

**Print Payment Receipt**

**टिप :-**

1. जर उमेदवाराने गुणपडताळणीसाठी रू. 100/- अगोदर भरले असतील तर पुन्हा झेरॉक्स प्रतीची मागणी केल्यास पुन्हा 400/- रू.भरावे लागतील.
२. अर्जाची प्रत व शुल्क भरलेल्या पावतीची प्रत परिषदेकडे पाठवू नये. उपरोक्त Flow Chart प्रमाणे कार्यवाही करावी.
3. Payment यशस्वीरित्या Paid झाले नाही, तर एका तासाने पुन्हा उपरोक्त Flow Chart प्रमाणे कार्यवाही करावी.
4. यासाठी ब्रॉडबॅन्ड/3G/4G/5G/WIFI सेवेचा वापर करा.